सकाळ
सातारा, रविवार, १७ एप्रिल २०२२

# डॉ. आंबेडकरांकडून भारताची जडणघडण

## डॉ. शरद गायकवाड; ऑनलाइन संवाद

**पळशी, ता. १६ :** बुद्धांच्या विचारांची पुनर्मांडणी आणि भारतीय राज्यघटना यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारताची जडणघडण केली, असे मत शासनाच्या अण्णा भाऊ साठे चरित्र साधन समितीचे सदस्य व कोल्हापूर येथील महावीर महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. शरद गायकवाड यांनी व्यक्त केले.

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाचा मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कोरेगाव शाखेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमानिमित्ताने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आधुनिक भारत' या विषयावरील फेसबुक लाइव्ह कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते. डॉ. गायकवाड म्हणाले, ''जात आणि धर्म हे भारतीय समाजाचे प्राचीन वैशिष्ट्य बाबासाहेबांनी मोडले. जातिव्यवस्थेची वेदना, अपमानाचे दाहक अनुभव घेऊनही त्यांनी भारतीय समाजाबद्दल सूडबुद्धी बाळगली नाही. बुद्धांचा मानवतावादी विचार आणि भारतीय राज्यघटना देऊन त्यांनी आधुनिक भारताची जडणघडण केली.'' प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनीही मार्गदर्शन केले. मराठी विभागप्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी प्रास्ताविक व प्रा. साधना जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. देवानंद सोनटक्के यांनी आभार मानले. डॉ. भगवान लोकडे, प्रा. सचिन निकम, प्रा. महेश आवळे, प्रा. केतन जाधव यांनी कार्यक्रमाच्या संयोजनासाठी परिश्रम घेतले.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव